प्रादेशिक उप संचालक व जिल्हा प्रशासन अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहन चालकासह वाहन <u>भाड्याने उपलब्ध करुन देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१९/प्र.क्र.१४७/नवि-१४
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ:</u> - नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा दि.१६.०७.२०१९ चा प्रस्ताव.

<u>प्रस्तावना</u>: -

राज्यातील ३६९ नगर परिषद नगरपंचायती यांच्या प्रशासकीय बाबींवर नियंत्रण ठेवणे, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे, शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीचे वाटप करणे, विकासकामांना प्रशासकीय मान्यता देणे अशी महत्त्वपूर्ण कामे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अधिनस्त ६ विभागीय कार्यालयात कार्यरत प्रादेशिक उप संचालक व ३४ जिल्हा कार्यालयातील जिल्हा प्रशासन अधिकारी यांचेमार्फत करण्यात येतात .

सदर प्रशासकीय जबाबदारीच्या निर्वाहनासाठी प्रादेशिक उप संचालक व जिल्हा प्रशासन अधिकाऱ्यांना संबंधित विभाग व जिल्ह्यामध्ये विविध नगरपरिषदा व नगरपंचायती यांना भेटी द्याव्या लागतात. सद्यस्थितीत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व दिन दयाळ अंत्योदय योजनेच्या साठी विशिष्ट कालावधीकरिता त्यांना वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. तथापि या अधिकाऱ्यांचे कार्य स्वरूप व नगरपरिषद/ नगरपंचायतींवर प्रभावी संनियंत्रण ठेवण्यासाठी दौरे व प्रत्यक्ष स्थळ भेटींची आवश्यकता याकरिता प्रशासकीय गतीमानतेच्या दृष्टीने, वाहन चालकासह एक वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. संचालनालयाने याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. तद्नुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u>: -

विभागीय व जिल्हा स्तरावर केंद्रिय व राज्य योजनांच्या अंमलबजावणीचे गुणात्मक संनियंत्रण होण्याच्या दृष्टीने नियंत्रक अधिकारी म्हणून संबंधित प्रादेशिक उप संचालक व जिल्हा प्रशासन अधिकारी यांना प्रशासकीय दौऱ्यांसाठी भाडेतत्वावर वाहन उपलब्ध करुन देण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे: -

१) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अधिनस्त ६ विभागीय कार्यालयात कार्यरत प्रादेशिक उप संचालक व ३४ जिल्हा कार्यालयातील जिल्हा प्रशासन अधिकारी यांना संबंधित विभाग व जिल्ह्यामध्ये विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये केंद्रिय व राज्य योजनांचे संनियत्रण, प्रशासकीय कामकाज, स्थळ भेटी यासाठी एक वाहन (वाहन चालकासह) भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) ६ प्रादेशिक उप संचालक व ३४ जिल्हा प्रशासन अधिकारी कार्यालयासाठी, वाहन चालकासह वाहन उपलब्धत करुन देण्यास्तव प्रत्येक कार्यालयासाठी प्रतिमाह अधिकतम रू.३०,०००/- इतका खर्च अनुज्ञेय असेल.

३) सदर खर्च सहायक अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय दि.३१.०८.२००९ मधील तरतूदीनुसार अनुज्ञेय असणाऱ्या अपरिहार्य कार्यालयीन खर्च याबाबी अंतर्गत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) संबंधित अधिकाऱ्यांमार्फत वाहनाचा उपयोग विहित प्रयोजनार्थ होईल, यासाठी संचालनालयामार्फत नियमित आढावा घेण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२७१७२००१९१२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.08.27 17:31:36 +05'30'

(सं. श. गोखले)
शासनाचे सह सचिव

प्रत: -

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त तथा संचालक
६. सर्व जिल्हाधिकारी
७. सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व प्रादेशिक उप संचालक व जिल्हा प्रशासन अधिकारी.
९. निवडनस्ती (नवि-१४).